लोकमत

# आजरा महाविद्यालयात उद्या संख्याशास्त्र शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**आजरा :** आजरा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या बी.एस्सी. भाग १ संख्याशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापकांसाठी उद्या, शनिवारी एकदिवसीय शिबिर आयोजित केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांनी दिली.

आजरा महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने होणाऱ्या या शिबिराचे सकाळी दहा वाजता प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष अशोक चराटी राहणार आहेत. यावेळी कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यांतील संख्याशास्त्र विभागाचे प्राध्यापक सहभागी होणार आहेत. शिबिराचे संयोजन संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. किरण पोतदार, प्रा. प्राजक्ता पाटील, प्रा. व्ही. बी. मळेकर, प्रा. वर्षा पाटील, प्रा. जयवंत पाटील, प्रा. आर. जी. ससाणे यांनी केले आहे.

विनम्र
श्रध्दांजली
कुळ दूध संघाचे माजी चेअरमन, आणि ज्येष्ठ संचालक
. अरुण डोंगळेसाहेब यांचे ज्येष्ठ बंधू, भोगावती
रखान्याचे संचालक धीरज डोंगळे यांचे वडील,
मचे कौटुंबिक स्नेही आणि खराडे परिवाराचे
र्गदर्शक, 'गोकुळ'चे माजी संचालक **मा. विजयसिंह**

Hello Kolhapur
Page No. 6 Aug 24, 2018
Powered by: erelego.com



महावीर कॉलेज येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करताना डॉ. राजन गवस. उपस्थितांत प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, ॲड. के. ए. कापसे आदी.

# माणूस घडवणारे शिक्षण महत्त्वाचे

**डॉ. राजन गवस; मुक्त विद्यापीठाचा पदवीदान सोहळा**

कोल्हापूर : 'तांत्रिक शिक्षणाबरोबर माणूस घडवणारे शिक्षण महत्त्वाचे आहे. आज माणूस शिक्षण घेऊन भौतिक सुखाच्या मागे लागला आहे. माती आणि नाती विसरत तो गावगाड्यापासून दुरावत चालला आहे. शिक्षणाला सुखाचे व संपत्तीचे साधन मानले जात आहे, अशा परिस्थितीत शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी शिक्षण साक्षरतेची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. ते यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र, कोल्हापूर व महावीर महाविद्यालय अभ्यासकेंद्राच्या वतीने आयोजित पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. गवस म्हणाले, 'गोरगरीब व उपेक्षित विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवण्यामध्ये मुक्त विद्यापीठ यशस्वी ठरले आहे. स्नातकांनी आपल्या शिक्षण व पदवीचा समाजासाठी उपयोग करावा.'

विभागीय संचालक प्रा. दादासाहेब मोरे म्हणाले, 'पारंपरिक विद्यापीठाच्या शिक्षण पद्धतीला छेद देत मुक्त विद्यापीठाने कौशल्याधिष्ठीत शिक्षण घरोघरी पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. १४३ शिक्षणक्रमाच्या पाच हजार पदवीचे वितरण करीत असल्याचा आनंद होत आहे.'

याप्रसंगी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व अभ्यासकेंद्रातील स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व अभ्यासकेंद्राचे केंद्रप्रमुख , केंद्रसंयोजक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी केले. परिचय केंद्रसहाय्यक प्रा.बसवराज वस्त्रद यांनी करून दिला तर आभार केंद्रसंयोजक प्रा. डॉ. महादेव शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. विश्वास पाटील व प्रा. तनया कणवर्गी यांनी केले.